**“मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना” सुरु करणे व ती राबविण्याकरीता सोपी व सुलभ कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत. शुध्दीपत्रक**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**

शासन शुध्दीपत्रक क्रमांक: लवेसू २०२५/प्र.क्र.०२/(E१४५२७१०)/पाणंद रस्ते
पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२
तारीख: १८ फेब्रुवारी, २०२६

**वाचा :-**

१. महसूल व वन विभाग, शा.नि. क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र. ०२/पाणंद रस्ते, दि. १४.१२.२०२५

**प्रस्तावना -**

राज्यातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि शेतीमालाची सुलभ वाहतूक सुनिश्चित करण्यासाठी बारमाही शेतरस्ते असणे अत्यंत आवश्यक आहे. या हेतूने राज्य शासनाने "मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना" सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने दिनांक ०२.०१.२०२६ रोजी नागपूर येथे एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेमध्ये उपस्थित मुद्दांच्या अनुषंगाने व लोकप्रतिनिधींकडून प्राप्त सूचनांच्या अनुषंगाने या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये अधिक सुसूत्रता आणण्यासाठी दिनांक १४.१२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

**शासन शुध्दीपत्रक -**

| अ.क्र. | दिनांक १४.१२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा | शासन शुध्दीपत्रक |
|---|---|---|
| १. | **३. कार्यान्वयीन यंत्रणा :-** **“मुख्यमंत्री - बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना”** कार्यक्रमांतर्गत रस्त्यांची कामे पुढीलपैकी कोणत्याही यंत्रणेमार्फत करता येतील. | **३. कार्यान्वयीन यंत्रणा :-** **“मुख्यमंत्री - बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना”** कार्यक्रमांतर्गत रस्त्यांची कामे पुढीलपैकी कोणत्याही यंत्रणेमार्फत करता येतील. |

| | | |
|---|---|---|
| | i) ग्रामपंचायत<br>ii) पंचायत समिती<br>iii)जिल्हा परिषद बांधकाम विभाग/उपविभाग<br>iv) प्रधानमंत्री/मुख्यमंत्री ग्रामसडक योजना विभाग<br>v) वनविभाग (वनजमीन असेल तेथे)<br>vi) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण | i) ग्रामपंचायत<br>ii) पंचायत समिती<br>iii)जिल्हा परिषद बांधकाम विभाग/उपविभाग<br>iv) प्रधानमंत्री/मुख्यमंत्री ग्रामसडक योजना विभाग<br>v) वनविभाग (वनजमीन असेल तेथे)<br>vi) महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे (NMRDA, MMRDA, PMRDA इ.), CIDCO, नागरी क्षेत्रातील इतर प्राधिकरणे इ. |
| २. | **४. तांत्रिक मान्यता :-**<br>शेत/पाणंद रस्त्यांच्या कामांना तांत्रिक मान्यता देताना सार्वजनिक बांधकाम विभाग नियमावली परीशीष्ट ४२ (सुधारीत) प्रमाणे तांत्रीक मान्यतेचे अधिकार राहतील. ज्याठिकाणी वन जमीन असेल तेथे तांत्रिक मान्यता वन विभागामार्फत देण्यात येईल. | **४. तांत्रिक मान्यता :-**<br>शेत/पाणंद रस्त्यांच्या कामांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार खालीलप्रमाणे राहतीलः-<br>१. उपविभागीय अभियंता- रु.२५.०० लाखपर्यंत<br>२. कार्यकारी अभियंता - रु.२५ लाखाच्या वर<br>ज्याठिकाणी वन जमीन असेल तेथे तांत्रिक मान्यता वन विभागामार्फत देण्यात येईल. |
| ३. | **६. निविदा पध्दती :-**<br>शेत/ पाणंद रस्त्यांचे एकूण २५ कि.मी. क्लस्टर तयार करुन निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी. निविदा प्रक्रिया ही विधानसभा क्षेत्र समितीचे सदस्य सचिव उपविभागीय अधिकारी यांनी संबंधित | **६. निविदा पध्दती :-**<br>शेत/पाणंद रस्त्यांचे क्लस्टर जास्तीत जास्त २५ कि.मी. असेल, मात्र निधीच्या उपलब्धततेनुसार २५ कि.मी पेक्षा कमी लांबीचे क्लस्टर करण्यास मुभा देण्यात येत आहे. शेत/ पाणंद रस्त्यांचे एकूण २५ कि.मी. |

| | | |
|---|---|---|
| | कार्यान्वयीन यंत्रणांच्या सहाय्याने राबवावी. जिल्हास्तरीय समितीने पात्र ठरविलेल्या पॅनलमधील कंत्राटदार व पाईप पुरवठादार यांना सदर निविदेमध्ये भाग घेता येईल. | किंवा त्यापेक्षा कमी लांबीचे क्लस्टर तयार करुन उपविभागीय अधिकारी यांनी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणांच्या सहाय्याने लॉटरी पध्दतीने जिल्हास्तरावर निश्चित केलेल्या पॅनेलमधून कंत्राटधारकाची निवड करण्यात यावी. |
| ४. | **७. देयके अदा करण्याचे अधिकार :-** तांत्रिक यंत्रणेने देयके प्रमाणित केल्यानंतर देयके अदा करण्याचे अधिकार विधानसभा क्षेत्र समितीचे सदस्य सचिव उपविभागीय अधिकारी यांना राहतील. | **७. देयके अदा करण्याचे अधिकार :-** तांत्रिक यंत्रणेने देयके प्रमाणित केल्यानंतर देयके अदा करण्याचे अधिकार विधानसभा क्षेत्र समितीचे सदस्य सचिव उपविभागीय अधिकारी यांना राहतील. देयकामधील ८० टक्के रक्कम उपअभियंता बांधकाम यांचे स्वाक्षरीने प्रमाणपत्र व देयकामधील उर्वरित २० टक्के रक्कम कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षरीने पुर्णत्वाचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच अदा करण्याची कार्यवाही करावी. उपअभियंता बांधकाम यांचे स्वाक्षरीने देयकामधील ८० टक्के रक्कम अदा करतानाच शेत/पाणंद रस्त्याच्या लगत असणा-या शेतक-यांचे प्रमाणपत्र त्यासोबत जोडणे आवश्यक राहील. |
| ५. | **१०. इतर बाबी:-**<br>९) शेत रस्त्यांची तपासणी करताना खडी, मुरूम यांची दबाईबाबत तपासणी करण्यात यावी. यासाठी रस्त्यांची गुणवत्ता तपासताना core cutting बंधनकारक करावे. | **१०. इतर बाबी:-**<br>९) शेत रस्त्यांची तपासणी करताना खडी, मुरूम यांची दबाईबाबत तपासणी करण्यात यावी. यासाठी रस्त्यांची गुणवत्ता तपासताना core cutting बंधनकारक करावे. यासोबतच शेत/पाणंद रस्त्याची गुणवत्ता तपासणी संबधित जिल्ह्यातील |

| | | |
|---|---|---|
| | | कार्यकारी अभियंता यांनीसुध्दा करणे अनिवार्य राहील. |
| ६. | **१०. इतर बाबी:-**<br>१०) प्रस्तुत योजना राबविण्याकरीता कोणत्याही प्रकारचे भूसंपादन करण्यात येणार नाही. जे शेतकरी स्वत:हून त्यांची जमीन पाणंद रस्त्याकरीता देतील त्यांनी देण्यात येणा-या जमिनीचे नोंदणीकृत दानपत्र/बक्षीसपत्र / हक्कसोड करणे अनिवार्य राहील तसेच त्याबाबतची नोंद सदर शेतक-याच्या ७/१२ उता-यावर घेण्यात येईल. या प्रयोजनार्थ शेतक-याने शासनास दिलेली जमीन परत मागण्याचा/मिळण्याचा सदर शेतक-याला हक्क राहणार नाही. | **१०. इतर बाबी:-**<br>१०) प्रस्तुत योजना राबविण्याकरीता कोणत्याही प्रकारचे भूसंपादन करण्यात येणार नाही. जे शेतकरी स्वत:हून त्यांची जमीन पाणंद रस्त्याकरीता देतील त्यांनी देण्यात येणा-या जमिनीचे नोंदणीकृत दानपत्र/बक्षीसपत्र / हक्कसोड करणे अनिवार्य राहील. सदर नोंदणीकृत अभिलेखामध्ये लिहुन घेणार म्हणून शासनाच्या वतीने संबंधित ग्राम महसूल अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच नोंदणीकृत अभिलेखाची नोंद सदर शेतक-याच्या ७/१२ उता-यावर घेण्यात येईल. या प्रयोजनार्थ शेतक-याने शासनास दिलेली जमीन परत मागण्याचा/मिळण्याचा सदर शेतक-याला हक्क राहणार नाही. |
| ७ | १४. "मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना" राबविण्याकरिता विविध यंत्रणेमध्ये सुसूत्रता व जबाबदारीच्या स्पष्टतेसाठी स्थापन करण्यात आलेली विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीची रचना | १४. "मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना" राबविण्याकरिता विविध यंत्रणेमध्ये सुसूत्रता व जबाबदारीच्या स्पष्टतेसाठी स्थापन करण्यात आलेल्या विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीमध्ये पंचायत समिती कार्यालयातील लेखाधिकारी यांचा विधानसभा क्षेत्र स्तरीय समितीमध्ये सदस्य म्हणून समावेश करण्यात येत आहे. |
| ६. | **परिशिष्ट क्र.१ (१.८)** निविदा भरताना Performance Security म्हणून प्रति | **परिशिष्ट क्र.१ (१.८)** निविदा भरताना Performance Security म्हणून प्रति |

| | | |
|---|---|---|
| | कंत्राटदार रू.१५.०० लक्ष सुरक्षा ठेव घ्यावी व त्या दरात त्यांनी काम न केल्यास उपरोक्त कंत्राटदाराचे नाव काळ्या यादीत टाकावे व सुरक्षा ठेव रक्कम सरकारजमा करावी. विधानसभाक्षेत्र निहाय न्युनतम दर निश्चित झाल्यानंतर या दरात इच्छुक यंत्रमालकाला रू.१५.०० लक्ष सुरक्षा ठेव घेऊन विधानसभाक्षेत्र निहाय यंत्रमालकाचे पॅनल तयार करावे. शेत/पाणंद रस्त्यासाठी लागणाऱ्या गाळ / माती / मुरुमासाठी स्वामित्व धन माफ असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुचीच्या अंदाजपत्रकापेक्षा प्रति किलोमीटर खर्च किमान २५ टक्केनी कमी आहे किंवा प्रती कि.मी. रु.१५.०० लक्ष पेक्षा अधिक नाही यापैकी जे कमी असेल याबाबतची खात्री करून उपरोक्त शेत/पाणंद रस्त्याची कामे हाती घेण्यात यावी. | कंत्राटदार रू.१५.०० लक्ष सुरक्षा ठेव घ्यावी व त्या दरात त्यांनी काम न केल्यास उपरोक्त कंत्राटदाराचे नाव काळ्या यादीत टाकावे व सुरक्षा ठेव रक्कम सरकारजमा करावी. जिल्हास्तरीय समितीने अंतिम केलेल्या कंत्राटदाराच्या पॅनेलमधील कंत्राटदाराची विधानसभा क्षेत्रस्तरीय समिती लॉटरी पध्दतीने निवड करेल. सदर कंत्राटदाराला देण्यात आलेल्या कामाच्या रक्कमेच्या २ टक्के रक्कम किंवा रु.१५ लक्ष यापैकी जी अधिक असेल ती रक्कम अनामत सुरक्षा ठेव (Security Deposit) घेण्यात यावी. |

२. दिनांक १४.१२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयामधील परिच्छेद क्रमांक १०. इतर बाबी मध्ये उप-परिच्छेद क्रमांक (११) नंतर पुढीलप्रमाणे उप-परिच्छेद क्रमांक (१२) समाविष्ट करण्यात येत आहे-

(१२) कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून निश्चित करण्यात आलेल्या महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे (NMRDA, MMRDA, PMRDA इ.), CIDCO, नागरी क्षेत्रातील इतर प्राधिकरणे यांनी शेत/पाणंद रस्ते तयार करण्याचे निर्णय घेतल्यास सदर प्राधिकरणांनी दिनांक १४.१२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच त्याप्रमाणे कार्यवाही करताना संबंधित प्राधिकरणांनी जिल्हास्तरीय समितीने ठरविलेले दर वापरुन वेगळी निविदा प्रक्रिया करावी. सदर प्राधिकरणांनी करावयाच्या शेत/पाणंद रस्त्यांच्या यादीस विधानसभा क्षेत्रस्तरीय

समितीकडून मान्यता घ्यावी.

**३.** दिनांक १४.१२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयामधील परिशिष्ट क्रमांक १ मध्ये पुढील मुद्दांचा समावेश करण्यात येत आहेः-

१.३ (अ) कंत्राटदाराकडे स्वमालकीची मशिनरी असावी की भाडेपट्टयाने घेतलेली असावी (Joint Venture) याबाबतचा निर्णय जिल्हास्तरीय समितीने घ्यावा.

२.७ (अ) - M-१० कॉंक्रिटच्या भिंती (Head Wall) ची आवश्यकता असल्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमावलीनुसार जिल्हास्तरावरील समितीने दरपत्रक निश्चित करावेत. तथापि, पाईप टाकल्यानंतर M-१० कॉंक्रिटच्या भिंतीचे काम करण्यापुर्वी स्टोन पिचिंग करुन काम भागत असेल तर त्याची प्रथम पडताळणी करावी व आवश्यकता असल्यासच M-१० कॉंक्रिटच्या भिंतीचे काम करावे.

२.८ (अ) - या योजनेंतर्गत करावयाचे रस्ते हे मुरुमीकरणापर्यंत करणे अभिप्रेत असून त्याकरीता रु.१५ लाख प्रती कि.मी. अशी मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे. रु. १५ लाखाच्या मर्यादेत जर जवळपास खडी उपलब्ध असेल तर खडीकरण करण्यास मुभा देण्यात येत आहे. रु.१५ लक्ष पेक्षा अधिक रक्कम खडीकरण करण्यासाठी लागल्यास कोणत्याही इतर योजनेच्या अभिसरणातून किंवा सी.एस.आर. मधून निधी उपलब्ध होत असल्यास खडीकरण करण्यास मुभा देण्यात येत आहे.

३.४) शेत/पांदण रस्त्याच्या ५ कि. मी. च्या परिसरात लहान नदी/महसूली नाले/कोल्हापूरी-साठवण बंधारे/मामा तलाव/ जलसंधारण विभागाचे तलाव या स्त्रोतांचे खोलीकरण करुन यातून निघणारी माती/मुरुम/दगड/काळी रेती ही पांदण रस्ते करीता विनारॉयल्टी वापरावी.

३.५) पांदण रस्त्यांची सीमा ही अधिसूचित झाडे लावून निश्चित करावी.

३.६) कार्यान्वयीन यंत्रणेमार्फत अंदाजपत्रक तयार करताना किमान २ टक्के इतक्या आकस्मिक निधीची (Contingency Fund) तरतूद करण्यात यावी. सदर निधीचा वापर कार्यालयीन खर्च, गुणवत्ता तपासणी इ. साठी करावा. तसेच सदर निधीमधून शासनाच्या प्रचलित नियमानुसार बाह्ययंत्रणेद्वारे १ स्थापत्य अभियंत्याची नेमणूक करण्याची मुभा विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीस देण्यात येत आहे.

४. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०२१८१९२८००४९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRATAPSINH MACCHINDRA KHARAT

Digitally signed by PRATAPSINH MACCHINDRA KHARAT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=0e963b9a3b438beeb9634a49f8df67395a23cc57553bf27836 0d37dc7d2fbada, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E85A4EBC6765D49CC36FAB03572D08CB37730598769 20F924659873AA200A822, cn=PRATAPSINH MACCHINDRA KHARAT
Date: 2026.02.18 20:53:58 +05'30'

(प्रतापसिंह खरात)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण), यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ), यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. मंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्यमंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा. लोकसभा/राज्यसभा सदस्य (सर्व), महाराष्ट्र राज्य,
८. मा. विधानसभा/विधान परिषद सदस्य (सर्व), महाराष्ट्र राज्य,
९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
१०. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मुंबई,
११. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२. सर्व विभागीय आयुक्त
१३. आयुक्त, नरेगा नागपूर
१४. आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य, पुणे
१५. सर्व जिल्हाधिकारी.
१६. सर्व पोलीस अधिक्षक.
१७. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

१८. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई

१९.महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरिता)

२०.महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १ व २. मुंबई व नागपूर.

२१.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २. मुंबई व नागपूर.

२२.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

२३.सर्व उपसचिव/सर्व अवर सचिव व सर्व कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग

२४.निवडनस्ती (पाणंद रस्ते)